2 6 JUN 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची आज जयंती

## अभिवादनासाठी करवीरनगरी सज्ज : विविध कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती आज, शनिवारी विविध संस्था, संघटनांच्यावतीने व्याख्याने, अभिवादन, आदी कार्यक्रमांनी साजरी होणार आहे. कोरोनाच्या नियमांचे पालन करून जयंती सोहळा साजरा करण्यासाठी करवीरनगरी सज्ज झाली आहे. ऑनलाईन व्याख्याने, लेखकांशी संवाद असे कार्यक्रम होणार आहेत.

कसबा बावडा येथील लक्ष्मी विलास पॅलेस येथे शनिवारी सकाळी आठ वाजता राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना अभिवादन करण्याचा कार्यक्रम होईल. दसरा चौक येथे सकाळी नऊ वाजता दसरा चौक येथे अभिवादनाचा कार्यक्रम होणार आहे. सव्वा नऊ वाजता लाईन बाजार येथील सेवा रुग्णालयात राजर्षी शाहूंच्या तैलचित्राचे प्रकाशन करण्यात येणार आहे. या तिन्ही कार्यक्रमांना पालकमंत्री सतेज पाटील प्रमुख उपस्थित असणार आहेत. दुपारी बारा वाजता बहुजन समाज पार्टीच्या कोल्हापूर जिल्हा युनिटतर्फे दसरा चौकातील मुस्लिम बोर्डिंग येथे जयंतीचा सोहळा साजरा केला जाणार आहे.

### ऑनलाईन व्याख्याने

- भोसलेवाडी-कदमवाडी येथील सुसंस्कार शिक्षण मंडळातर्फे शनिवारी सकाळी आठ वाजता कॉम्रेड उमेश सूर्यवंशी यांचे व्याख्यान होईल. शिवाजी विद्यापीठातर्फे सकाळी अकरा वाजता ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'शिव-वार्ता' युट्यूब वाहिनीवर व्याख्यान होणार आहे.



- मुंबई विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल रिसर्च सेंटरतर्फे सकाळी अकरा वाजता ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांचे व्याख्यान होईल. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या सहायक आयुक्त (समाज कल्याण) कार्यालयाकडून दुपारी बारा वाजता शिवशाहीर राजू राऊत यांचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जीवनावर आधारित ऑनलाईन व्याख्यान होणार आहे.

कोरोनामुळे अखिल भारतीय मराठा महासंघाने राजर्षी शाहू लेखमाला ऑनलाईन आयोजित केली आहे. स्नेहसंगीत प्रतिज्ञा मंचतर्फे 'संवाद शाहू लेखकांशी' हा एफबी लाईव्ह उपक्रम राबविण्यात येणार आहे. त्यामध्ये 'शाहू कादंबरीकार' श्रीराम पचिंद्रे, 'शाहू पोवाडाकार' युवराज पाटील, 'राजर्षी' पुस्तकाचे लेखक उमेश सूर्यवंशी मार्गदर्शन करणार आहेत. आजी-माजी विद्यार्थी कृती समिती शिवाजी विद्यापीठ व मराठा ऑर्गनायझेशन यांच्यावतीने अंध कलाकारांना महिना पुरणारा शिधा दिला जाणार आहे. दि. २७ ते २९ जून दरम्यान सायबर चौक येथील आजी-माजी विद्यार्थी सहाय्यता केंद्रात सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळेत दाखले देण्याचे शिबीर होणार असल्याची माहिती डॉ. प्रवीण कोडोलीकर आणि ऋतुराज माने यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष

2 6 JUN 2021 लोकसत्ता - शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात ‘मियावाकी’ जंगलनिर्मितीस प्रारंभ

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कोल्हापूर** : जलसंवर्धनाच्या कामाबरोबरच आता शिवाजी विद्यापीठाने गर्द वनराईची निर्मिती करणाऱ्या मियावाकी जंगल निर्मितीस प्रारंभ केला आहे. या अभिनव उपक्रमास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते शनिवारी प्रारंभ करण्यात आला. जैवविविधता विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे, असे शिर्के म्हणाले.

मियावाकी जंगल (दाट वनराई) ही दाट वृक्षारोपणाची मूळ जपानी संकल्पना असून त्याअंतर्गत विविध प्रकारच्या प्रजातींची गर्द, दाट वनराई होईल, अशा प्रकारे लागवड करण्यात येते. परिसरात वनस्पतींच्या वैविध्यतेबरोबरच जैववैविध्यतेचाही विकास होतो. विविध प्रकारचे पशुपक्षी या वनराईच्या आश्रयास राहावयास येतात. विद्यापीठाच्या क्रीडा संकुलाच्या शेजारील परिसरामध्ये मियावाकी जंगल लागवडीस कुलगुरूंच्या हस्ते जांभूळ रोप लावून प्रारंभ करण्यात आला. साडेसात गुंठ्यांच्या परिसरात बहावा, कांचन, जांभूळ, चिंच, विलायती चिंच, फणस, जास्वंद, अडुळसा, रातराणी, तगर, चाफा, धावडा आणि बांबू अशा तेरा प्रजातींच्या एकूण ९५८ रोपांची लागवड करण्यात आली. ही सर्व रोपे विद्यापीठाच्या रोपवाटिकेत तयार करण्यात आली आहेत. विद्यापीठाच्या परिसरात दहा विविध ठिकाणी मियावाकी जंगलांची निर्मिती करण्याचा मानस आहे, अशी माहिती उद्यान विभागाचे उपकुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 JUN 2021
पुढारी

# विद्यापीठात आज डॉ. जयसिंगराव पवार यांचे विशेष व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीच्या निमित्ताने 'शिव-वार्ता' यूट्यूब वाहिनीवर शनिवारी (दि.२६) सकाळी दहा वाजता ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'राजर्षी शाहू महाराज आणि राष्ट्रीय एकात्मता' या विषयावर विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के असणार आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमाचा ऑनलाईन उपस्थित राहून लाभ घ्यावा. ऑनलाईन व्याख्यान ऐकण्यासाठी https://youtu.be/uwE6YpgvzvE लिंकला भेट द्यावी, असे आवाहन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 JUN 2021
सकाळ

» दृष्टिक्षेपात

# डॉ. जयसिंगराव पवार यांचे आज व्याख्यान

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे शनिवारी (ता. २६) राजर्षी शाहू जयंतीनिमित्त ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचे 'राजर्षी शाहू महाराज आणि राष्ट्रीय एकात्मता' यावर विशेष ऑनलाईन व्याख्यान आयोजित केले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित राहतील. शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कोविड-१९ च्या निकषांचे पालन करीत २६ जून रोजी सकाळी १०.३० वाजता कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात येईल. अभिवादन कार्यक्रमानंतर सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' (www.youtube.com/c/ShivVarta) या यू-ट्यूब वाहिनीवरून डॉ. पवार यांचे व्याख्यान होईल. ऑनलाईन व्याख्यानाचा शिक्षक, विद्यार्थी यांच्यासह नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 JUN 2021
तरुण भारत

# राजर्षी शाहू जयंतीनिमित्त आज विविध कार्यक्रम

**कोल्हापूर :** लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती शनिवारी २६ रोजी साजरी होत आहे. हा जयंतीचा सोहळा साधेपणाने, सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोर पालन करत ऑनलाईन पध्दतीने साजरा करण्यात येणार आहे. सकाळी ८ वाजता कसबा बावडा येथील शाहू जन्मस्थळावर (लक्ष्मी विलास पॅलेस) जिल्हा प्रशासनाच्या वतीने जयंती साजरी केली जाणार आहे. यावेळी पालकमंत्री सतेज पाटील, ग्रामविकासमंत्री हसन मुश्रीफ, आरोग्य राज्यमंत्री राजेंद्र पाटील-यड्रावकर यांच्यासह आमदार व खासदार उपस्थित राहणार आहेत. शाहू जन्मस्थळावर राजर्षी शाहू महाराजांना अभिवादन केल्यानंतर दसरा चौकातील राजर्षींच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यात येईल.

दरम्यान, शाहू जयंतीचे औचित्य साधून मुंबई विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल रिसर्च सेंटरने ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. रमेश जाधव यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. सकाळी ११ वाजता प्रारंभ होणाऱ्या या व्याख्यानाचा 'समतेचे कैवारी राजर्षी छत्रपती शाहू महाराज' असा विषय आहे. मुंबई विद्यापीठाच्या ऑनलाईन पेजद्वारे व्याख्यानात सहभागी होता येईल. शिवाजी विद्यापीठानेही ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. सकाळी ११ वाजता व्याख्यानाला प्रारंभ होईल. https://youtu.be/uwE6YpgvzvE या लिंकद्वारे व्याख्यानात सहभागी होता येईल. याशिवाय बहुजन समाज पार्टी, अखिल भारतीय मराठा महासंघ, स्नेहसंगीत प्रतिज्ञा मंच, सुसंस्कार शिक्षण मंडळ भोसलेवाडी-कदमवाडी यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे ऑनलाईन पद्धतीने आयोजन केले जाणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 6 JUN 2021
तरुण भारत

# शाहू महाराजांच्या धार्मिक कार्याचा पुस्तकरूपातून आढावा

शिवाजी विद्यापीठातील शाहू संशोधन केंद्रात संशोधक असणाऱ्या डॉ. देविकाराणी पाटील या शाहू महाराजांचे चित्रमय चरित्र ग्रंथाच्या सहलेखिका तर छत्रपती राजाराम महाराज चित्रमय चरित्र ग्रंथाच्या संपादक, लेखक आणि संकलक आहेत. त्यांनी क्षात्रजगद्गुरू यांचे सामाजिक आणि धार्मिक कार्याचा ऐतिहासिक अभ्यास या विषयावर पीएचडी केली आहे. यावर आधारित ग्रंथही तयार केला आहे. तो लवकरच प्रकाशित होणार आहे.



डॉ. देविकाराणी पाटील

आपल्या संधोधनाविषयी डॉ. देविकाराणी पाटील सांगतात, शाहू संशोधन केंद्रात काम करताना रेफरन्स पुरवणे, नोटस् काढणे, दुर्मीळ कागदपत्रे, छायाचित्रे आदींचे संकलन सुरू केले. शाहूकालीन कागदपत्रांचे वाचन सुरू केले. शाहू महाराजांवर